MHNS140009892024

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.३९/२०२४**

**सौ. सपना शेट्टी व इतर वि.**
**श्री. नविन शेट्टी व इतर.**

**निशाणी क्र.१२ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जावर सामनेवालाचे म्हणणे मागविले. सामनेवालांनी प्रस्तुत अर्जाकामी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.१८ वर दाखल केलेले आहे. युक्तीवाद ऐकला.

**०२.** अर्जदारांच्या वकिलांनी युक्तीवाद केला की, अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक २०/०१/२०२० रोजी समाज मंदीर वणी, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे वैदीक पध्दतीने झाला असुन सदर विवाह संबंधातुन एक मुलगी धनश्री, वय २ वर्षे झाली असुन अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांच्यातील पती—पत्नीचे नातेसंबंध अद्याप कायम आहेत.

**०३.** अर्जदाराची आई वणी गडावर फुलमाळा विक्री करते. लग्नाअगोदर सन २०१९ मध्ये सामनेवाले वणी येथे देवीचे दर्शनासाठी आले असता अर्जदार व सामनेवाले यांची ओळख झाली. सामनेवाला क्र.१ ने अर्जदाराचे आईकडे लग्नासाठी मागणी घातली. दोघांमध्ये वयाचे अंतर असल्यामुळे तसेच वेगवेगळ्या समाजाचे असल्यामुळे अर्जदाराचे आईने लग्नाला विरोध केला होता. सामनेवाला क्र.१ ने तो जात, धर्म मानत नाही व पहिल्या बायकोसोबत घटस्फोट झालेला आहे असे सांगीतले व कन्नड भाषेतील कागदपत्र दाखविले. त्यानंतर अर्जदाराचे आईचा विश्वास संपादन करून अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह झाला होता. जानेवारी २०२० पासुन अर्जदार अनिकेत हॉटल, गडहिंगलज, जिल्हा कोल्हापुर येथे सामनेवालेचे सोबत एकत्र कुटुंबात राहण्यास गेली. तेथे राहत असतांना दोन वर्षे सामनेवालाने चांगले नांदविले. त्यानंतर सामनेवाल्यांनी अर्जदारांचा मानसिक व

शारिरीक छळ करण्यास सुरवात केली. अर्जदार गरोदर राहिल्यानंतर तिला वणी येथे सामनेवाला घेवुन आले. दिनांक १९/०८/२०२१ रोजी अर्जदार क्र.२ हिचा जन्म झाला. त्यानंतर एक दोन वर्षे तु माहेरीच राहा असे म्हणुन सामनेवाल्यांनी तिला परत नेले नाही. डिसेंबर २०२१ मध्ये खंडेराव नगर, वणी येथे मोहन शेठ यांचे मालकीचे खोलीत अर्जदार व सामनेवाले भाड्याने राहू लागले तेव्हा सामनेवाला पंधरा दिवसांतुन एक दोन दिवस वणी येथे येत असत व अर्जदार, मुलीची संपुर्ण जबाबदारी पार पाडत होते. अर्जदार क्र.२ ही एक वर्षाची झाल्यानंतर सामनेवाले अर्जदार क्र.१ व २ यांना घेवुन जाण्यास टाळु लागले व मार्च २०२२ पासुन अर्जदारासोबत कुठलाही संबंध ठेवला नाही. उलट सामनेवाला 'तुला आम्ही कधीही सुनेचा दर्जा देणार नाही, सामनेवाले क्र.१ चे लग्न झालेले असतांना तु घरात घुसली आहे, तु आमच्या जातीची नाही' असे आरोपी करून शिवीगाळ करू लागले.

०४. त्यांनी पुढे युक्तिवाद केला की, अर्जदार स्वतःचा मुलीचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. सामनेवाला याचे स्वतःच्या मालकीचे मानगांव, ता. गडहिंगलज, जिल्हा कोल्हापुर येथे अनिकेत हॉटेल व बार असुन त्यापासुन दरमहा चार ते पाच लाख रूपये उत्पन्न मिळते, सामनेवाल्याजवळ स्वतःची ईन्होवा कार आहे, सामनेवाल्याचे दोन्ही भावांचे मुंबई येथे हॉटेल व बार आहेत, त्यापासुन त्यांना दरमहा पंचवीस ते तीस लाख रूपये मिळतात, सामनेवाल्यांचे वडीलोपार्जित मालककीची कन्नड, बेंगलोर येथे शेतजमीन असुन त्यापासुन वर्षाला तीस ते चाळीस लाख रूपये मिळतात, सामनेवाला यांचे कन्नड येथे फार्म हाउस व बंगलो आहे, सामनेवाला क्र.१ वर कोणाचीही जबाबदारी नाही. सबब, सामनेवाालाकडुन अंतरिम अन्न–वस्त्रापोटी दरमहा २५,०००/– रूपये व घरभाड्यापोटी दरमहा १०,०००/– रूपये अंतरिम रक्कमेपोटी सामनेवालेने द्यावे असा आदेश अर्जदारांचे लाभात व्हावा.

०५. सामनेवाल्यांच्या विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, सामनेवाला क्र.१ ने

कधीही अर्जदार क्र.१ सोबत लग्न केलेले नव्हते व नाही. सामनेवाला दर्शनासाठी वणी येथे जात असे त्यावेळी अर्जदाराच्या भावाशी मैत्री म्हणुन त्याला कामाची गरज होती असे तिच्या भावाने सांगीतल्यानंतर सामनेवाला हा तो काम करीत असलेल्या हॉटेलमध्ये त्याला नोकरी लावण्याकरीता घेवुन गेला. तेवढा पूरताच सामनेवाला यांचा वणी गावाशी संबंध होता व आहे. सामनेवाला क्र.१ ने कधीही पहिल्या पत्नीसोबत घटस्फोट घेण्याचे वक्तव्य केलेले नव्हते. सामनेवाला क्र.१ व त्यांची पत्नी यांच्यात आजही प्रेमाचे संबंध आहेत. सामनेवाले हे अनिकेत हॉटेल, गडहिंगलज येथे मॅनेजर म्हणुन नोकरीस होता. अर्जदाराचा भाउ सदर अनिकेत हॉटेलमध्ये साफसफाईचे काम करू लागला तेव्हा अर्जदार ही त्याच्याकडे भेटण्यासाठी येत होती. त्यातुनच तिने सामनेवाले यांचेसोबत ओळख काढुन जवळीक साधण्याचा प्रयत्न सुरू केला. सामनेवाला याला दोन मोठे मुले होती व त्याचे कौटुंबिक वातावरण खेळीमेळीचे होते. परंतु, मुळ कन्नड येथील रहिवाशी होता व त्याचे कुटुंबापासुन दुर कामधंद्या निमीत्त कोल्हापुर येथे एकटाच रूम करून राहत होता. अर्जदाराने अनेक प्रकारच्या भुलथापा देवुन सहानुभुती देवुन सामनेवाला क्र.१ शी जवळीक साधली व त्याला जाळ्यात अडकविले. अर्जदार ही सामनेवाला याचा केवळ उपभोग घेण्यासाठी, पैसे, दागीने लुबाडण्याकरीता त्याच्या सोबत राहत होती व ब्लॅकमेल करून शारिरिक संबंध देखील करून घेत होती. त्यातुनच अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांना दिनांक १९/०८/२०२१ रोजी अर्जदार क्र.२ धनश्री हिचा जन्म झाला. अर्जदार हिने सामनेवाल्याशी लग्न केलेले नाही व लग्नाची पत्नी कधीही व कुठेही सामनेवाल्यासोबत राहिलेली नाही. सामनेवालाची संसार मोडण्याची वेळ येत होती त्यामुळे अर्जदार हिने स्वतःहुन मी आता तुझ्याशी काहीही संबंध ठेवणार नाही अशा प्रकारचे समजुतपत्र लिहुन ठेवु असे बोलुन दिनांक ११/१०/२०२२ रोजी लिहुन दिलेले आहे. त्या समजुतपत्रामध्ये स्पष्टपणे उभयंतांचे लग्न झालेले नव्हते असा उल्लेख आहे. अर्जदाराने लग्नाची खोटी पत्रिका सादर केलेली आहे व दिनांक २०/०१/२०२० रोजी लग्न झाल्याचे खोटे सांगीतले आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

०६. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांच्यातील पती—पत्नीचे नाते वादातीत आहे. अर्जदाराने अभिलेखावर लग्नपत्रिका दाखल केलेली आहे परंतु, ती लग्नपत्रिका खोटी आहे असे सामनेवाल्याचे कथन आहे. सामनेवाल्याने दिनांक ११/१०/२०२२ रोजी समजुतपत्र झाल्याचे व त्यात उभयंतांचे लग्न झालेले नाही असे स्पष्ट नमुद केल्याचे कथन केलेले आहे. परंतु, सामनेवाल्यांनी ते समजुतपत्र प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेले नाही. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांना अर्जदार क्र.२ धनश्री ही मुलगी झाल्याचे वादातीत नाही. तसेच अभिलेखावर दाखल केलेल्या जन्म प्रमाणपत्रानुसार धनश्री हिचा जन्म दिनांक १९/०८/२०१९ रोजी झाल्याचे व वडीलांचे नाव नविन सुबय्या शेट्टी असल्याचे दिसुन येते.

०७. अर्जदार हिने नि.क्र.२० वर मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सामनेवाला क्र.१ ने त्याचे मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.२१ वर दाखल केले आहे. अर्जदार व सामनेवाले यांनी उत्पन्नाचे स्त्रोत दाखविण्याकरीता इतर कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

०८. सदरचा अर्ज अंतरिम पोटगीसाठी आहे तसेच अर्जदार हिचे कथन आहे की, अर्जदाराचा सामनेवाला यांनी कोणतेही संयुक्तीक कारण नसताना त्याग केलेला आहे. याउलट, सामनेवालाने अर्जदार हिने केवळ पैशांसाठी सामनेवाल्याला तिच्या जाळ्यात अडकविले व त्यांचा विवाह कधीही झालेला नाही असे कथन केले आहे. मुळ प्रकरणातील कथने दोन्ही बाजुंनी आपआपला पुरावा सादर केल्यानंतर शाबीत होणार आहेत. परंतु, सद्यपरिस्थीतीत अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ हे काही काळ एकत्र राहत होते व त्यांच्या संबंधातुन त्यांना अर्जदार क्र.२ ही मुलगी जन्माला आलेली आहे हे प्रथमदर्शनी दिसुन येते. अर्जदार क्र.१ हिच्यासोबत सामनेवाला क्र.१ राहिलेला असल्यामुळे त्यांच्यामध्ये कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा अन्वये घरगुती संबंध होते असे प्रथमदर्शनी दिसुन येते. अर्जदार क्र.१ ही सामनेवाला

क्र.१ सोबत राहण्यास तयार आहे व सामनेवाला क्र.१ तिच्यासोबत राहण्यास तयार नाही असे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे अर्जदार ही प्रथमदर्शनी पिडीत व्यक्ति असल्याचे दिसुन येते. अर्जदार क्र.२ ही सामनेवाला क्र.१ याचीच मुलगी असल्याचे सामनेवाला क्र.१ ने नाकारलेले नाही. त्यामुळे सामनेवाला क्र. १ यांच्यावर अर्जदारांच्या संगोपनाची जबाबदारी आहे.

**०९.** अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सामनेवाला याचे स्वत:च्या मालकीचे मानगांव, ता. गडहिंगलज, जिल्हा कोल्हापुर येथे अनिकेत हॉटेल व बार असुन त्यापासुन दरमहा चार ते पाच लाख रूपये उत्पन्न मिळते, सामनेवाल्याजवळ स्वत:ची ईन्होवा कार आहे, सामनेवाल्याचे दोन्ही भावांचे मुंबई येथे हॉटेल व बार आहेत, त्यापासुन त्यांना दरमहा पंचवीस ते तीस लाख रूपये मिळतात, सामनेवाल्यांचे वडीलोपार्जित मालककीची कन्नड, बेंगलोर येथे शेतजमीन असुन त्यापासुन वर्षाला तीस ते चाळीस लाख रूपये मिळतात, सामनेवाला यांचे कन्नड येथे फार्म हाउस व बंगलो आहे, सामनेवाला क्र.१ वर कोणाचीही जबाबदारी नाही. परंतु, त्यासाठी अर्जदाराने कसलाही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. याउलट, सामनेवालाने आपल्या मालमत्ता व दायित्वाच्या प्रमाणपत्रामध्ये अर्जदार ही नारळ व फुल विक्री व्यवसाय करीत असुन त्यातुन तिला दरमहा १०,०००/— रूपये उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. परंतु, त्यासाठी कसलाही प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. सामनेवाल्याने तो अनिकेत हॉटेल येथे नोकरी करतो व त्यातुन त्यास दरमहा १२,०००/— रूपये मिळतात असे मालमत्ता व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रात कथन केलेले आहे. अनिकेत हॉटेल हे सामनेवाला क्र.१ याच्या मालकीचे आहे किंवा कसे हे पुराव्यानंतर शाबित होणार आहे. परंतु, सद्यपरिस्थितीत सामनेवाला क्र.१ हा अनिकेत हॉटेल येथे काम करतो हे दिसुन येते. सामनेवाला क्र.१ याची अर्जदारांना अन्नवस्त्र देण्याची ऐपत आहे हे प्रथमदर्शनी दिसुन येते. सामनेवाला क्र.१ वर काही दायित्व असल्याचे त्याच्या प्रतिज्ञापत्रातुन दिसुन येत नाही.

**१०.** पक्षकारातील नातेसंबंध विचारात घेता व कायदयातील तरतुदींचा विचार करता अर्जदार ही दरम्यानचे अन्नवस्त्र मिळण्यास पात्र आहे. अर्जदार हिचे अंतरिम अन्नवस्त्राची तरतुद करण्याची जबाबदारी सामनेवाला क्र.१ याची आहे. त्यामुळे, अर्जदारांच्या मुलभुत अशा दैनंदिन गरजा व उपलब्ध अभिलेखावरुन सामनेवाला क्र.१ यांस मिळणारे उत्पन्न विचारात घेता अर्जदार क्र.१ हीस स्वत:साठी रूपये १,०००/— दरमहा व अर्जदार क्र.२ हिच्यासाठी रूपये २,०००/— दरमहा असे मिळुण दरमहा रूपये ३,०००/— दरम्यानचे अन्नवस्त्रा पोटी व घरभाड्यापोटी देणे रास्त व उचीत ठरेल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**: आदेश :**

१. प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ यास आदेशीत करण्यात येत आहे की, त्याने अर्जदार क्र.१ हीस स्वत:साठी दरमहा रक्कम रुपये १,०००/— (रूपये एक हजार मात्र) व अर्जदार क्र.२ हिच्यासाठी दरमहा रक्कम रूपये २,०००/— (रूपये दोन हजार मात्र) असे मिळून दरमहा रक्कम रूपये ३,०००/— (रूपये तीन हजार मात्र) प्रस्तुतचा मुळ अर्ज दाखल केलेल्या तारखेपासुन दरम्यानचे अन्नवस्त्रापोटी दयावे.

३. अर्जाचा खर्च मुळ अर्ज निकाली करताना गुणदोषावर ठरविण्यात येईल.

५. या आदेशाची प्रत अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित).

SHRUTI CHANDRAKANT NIRMALE

Digitally signed by SHRUTI CHANDRAKANT NIRMALE
Date: 2025.05.16 17:14:54 +0530

(एस .सी. निर्मळे)

दिनांक:— १५/०५/२०२५. न्यायंदडाधिकारी प्रथम वर्ग, दिंडोरी